# तरुणाईचे दिवस : दादा धर्माधिकारींसोबत

डॉ. अभय बंग

माझ्या लहानपणी सर्वोदय जगतात अनेक महान व्यक्तित्वे अुभी होती. त्या सर्वात अर्थात विनोबा अेखाद्या भव्य अश्वत्थ वृक्षासारखे मध्यभागी अुभे होते - विराट, विद्वान व मूर्तिमंत वैराग्य. या वनात दादा अेखाद्या विशाला आम्रवृक्षासारखे होते. मधुर फळे आणि शीतल छाया दोन्ही आम्हाला त्यांच्याकडून मिळाल्या. पण दादांची पहिली ओळख मला वेगळ्याच कारणाने आठवते.

सर्व सेवा संघाचे अधिवेशन सुरु होते. मी त्यावेळेस आठवीत शिकत होतो. कुतुहुलाने मी सभास्थळी आत डोकावून पाहिलं - अेक शिडशिडीत शरीरयष्टीचा शुभ्र वस्त्रातला वयस्क माणूस भाषण देत होता. सर्वजण अतिशय शांतपणे अैकत होते. कोण हे ? मी विचारलं. शूSSS बोलू नकोस दादा धर्माधिकारी बोलताहेत. कोणीतरी माझ्यावर खेकसलं. मी लक्ष देअून अैकण्याचा आव आणला. लक्षात फक्त राहिले दादांनी वापरलेले दोन शब्द - ‘मुमुक्षू’ व ‘तितिक्षा’! अर्थ मुळीच कळला नाही. चांगलेच कठीण शब्द येतात यांना. हा दादा धर्माधिकारी माणूस भारी आहे!” मी मनाशी खूणगाठ बांधली, व खेळायला बाहेर पळालो.

किशोरावस्थेतून तारुण्यात प्रवेश केला. भूदान-ग्रामदान चळवळीत आम्ही स्वयंसेवक म्हणून दाखल झालो. नवे भरती झलेले अनुयायी म्हणून आमच्याकडे काहीशा कौतुकाने बघितले जायचे. आम्ही कदाचित कायम स्वयंसेवकच राहिलो असतो, पण दोन घटना आमच्या जीवनात घडल्या ज्यांची आम्हाला आमच्या तारुण्याच्या दिव्यतेचं आत्मभान करवलं. त्या घटना म्हणजे तरुण शांतीसेना व दादा धर्माधिकारी !

दादा आम्हाला म्हणाले, तरुणांनो, तुम्ही आमचा अुपदेश मानू नका. आमची कार्बनकॉपी बनू नका. कोणतंच मत, सिध्दांत स्वीकारु नका. दादांनी आम्हाला अनुयायाच्या भूकिमेतून सुरवातीलाच मुक्त केलं.

आणि त्यानंतर दादांनी आम्हाला स्वप्न दिलं. म्हणाले, आज समाजात ज्याच्याकडे पैसा आहे त्याला वस्तू मिळते गरज आहे त्याला नाही. मानवी नात्यांत बाजार शिरला आहे. भूक, आजार हीच पुरेशी योग्यता आहे. त्याला गरज आहे त्याला वस्तू मिळावी असा समाज निर्माण करणं ही तरुणांची आकांक्षा असावी. माणसा-माणसांच्या नात्यातून बाजार, सरकार व शस्त्र या तीन सैतानी संस्थांचे अुच्चाटन व्हायला हवे ! तुमचा संकल्प असावा की जशा जगात जन्माला आलो तशा जगात मरणार नाही. त्याला बदलून जाईन.

पण दादा, असं खरचं कधी होअू शकतं ? आम्ही तरुणांनी थोड्या साशंकतेने विचारलं.

"होऊ शकतं रे! आजवर झालं नाही असं पुष्कळच पुढे होणार आहे - कारण आता तू जन्माला आला आहेस. तुझा जन्म ही अैतिहासिक घटना आहे. तू अुद्याच्या जगाचा राजपुत्र आहेस!"

दादांनी आम्हा तरुणांमधे सिंडरेलासारखं जादुई परिवर्तन घडवलं. आम्ही निव्वळ अनुयायी अुरलो नाही. स्वप्न बघणारे झालो. दादांनी आम्हाला समाज परिवर्तनाचं अुदात्त, रोमॅंटिक स्वप्न दिलं. तारुण्यात स्वप्न मिळणं याहून मोठं वरदान नाही !

१९६८ चं वर्ष अुजाडलं. जगात प्रचंड अुलथापलथ होत होती. १९६५ ते ७५ हे तरुणाईच्या विश्व स्फोटाचं दशक होतं. सर्वत्र तरुणांच्या क्रांतिकारक चळवळी होत होत्या. तेव्हा टेलिव्हिजन किंवा अुपग्रह वाहिन्या नव्त्या. विश्वभरात घडणाऱ्या या नवीन प्रवाहांचं विश्वरुप दर्शन संजयसारख्या दिव्यदृष्टीने बघून दादा आम्हाला सांगू लागले. दादा अतिशय भारावलेले व अुत्साहात होते. भारतातील विद्यार्थी चळवळी कॉपी करण्याचा हक्क किंवा फी-वाढ विरोध असल्या मुद्यांत फसलेल्या असतांना तरुण शांतिसेनेच्या मुंबई व अहमदाबाद शिबिरात १९६९ व ७० साली दादांनी आम्हाला हा सर्व वैश्विक संदर्भ समजवून दिला. फ्रांस, अमेरिका येथील रुणांच्या चळवळी व मागण्या सांगितल्या. त्या मागची विचारधारा समजावून दिली. हंगेरी, चेकोस्लोव्हकिया मधील तरुण रशियन रणगाड्यांशी लढत होते. अमेरिकेमधे हिप्पी संस्कृती अुदयाला येत होती. हे म्हणतात, आदिम पध्दतींनी जगणं हेच खरं जीवन. यांचा अेक गुरु आहे हेन्री मिलर. तो अुत्स्फूर्त कृती - spontaneous action ला फार महत्व देतो. या तरुणांची दिशा आहे Neo-naturalism, New holism व New eminentism कडे!"

दादांनी आम्हाला फ्रांस मधील १९५८ च्या युवाक्रांती विषयी, त्या चळवळीचा नेता डॅनियल कॉहन बेंडिट याविषयी सांगितलं. समृध्दीप्रती असमाधान, शिक्षणद्वारा नव्या पिढीचं कंडिशनींग करण्याविरुध्द विद्रोह या त्यांच्या प्रेरणा सांगितल्या. ही क्रांती भुकेच्या आगीतून नव्हे तर जाणीवेच्या असमाधानातून निर्माण होते आहे. फ्रांसमधे युवक व कामगार अेकत्र आले. द गॉलला राजीनामा द्यावा लागला.

आज या घटनेला तीस वर्षे झालीत. त्यावेळी वीस वर्षांची असलेली आमची पिढी आता पन्नास वर्षाची झाली. चष्मे बायफोकल झालेत. दूर बघण्यापेक्षा जवळचं बघणं अधिक महत्वाचं झालं. त्या पिढीचं, त्या क्रांतीच्या स्वप्नांचं काय झालं ? दादांचा विश्वास आम्ही सार्थ ठरवला का ? माझ्या पिढीला हा प्रश्न छळतो.

पण कालप्रवाह वाहतच होता. १९७६ चं वर्ष अुजाडलं. आणिबाणी लागू होती. विनोबांच्या भूमिकेमुळे दादा अत्यंत अस्वस्थ व दुःखी होते. मी नागपूरला अेम्.डी.चं शिक्षण पूर्ण करत होतो. त्या काळात मी राणीच्या प्रेमात पडलो. माझे आई-वडील दोघेही जेलमधे होते. विनोबांना भेटायला व आशीर्वाद घ्यायला आम्ही दोघे गेलो. विनोबा म्हणाले, "सावधान ! संसाराच्या बेड्या पडण्यापूर्वी पळून जा!" काय करणार ? दादांना भेटायला गेलो. दादांनी आम्हा दोघांना प्रेमाने आशीर्वाद दिला. माझ्या मनात

क्रांती करण्याअैवजी आपण प्रेम केलं, लग्न करतो आहोत या गोष्टींविषयी थोडी आपराधी भावना होती. म्हणून मी दादांशी बोलतांना अुल्लेख केला - दादा, आमचं आंतर्जातीय लग्न ठरेल, लग्नानंतर राणी सामाजिक काम करेल........ वगैरे. त्यावर दादा म्हणाले,  जातिप्रथा मोडण्यासाठी किंवा सामाजिक कार्यकर्ती मिळवण्यासाठी लग्न करु नकोस. लग्न तिच्यासाठी कर !"

पारस्परिकता, प्रेम हेच दादांसाठी जीवनातलं सर्वोच्च मूल्य होतं. तेच दादांचं अध्यात्म होतं.

माणसांवर अविश्वास करणे दादांना जमायचं नाही. ते सत्य-निष्ठ नव्हते सत्य व विश्वास त्यांचा स्वभाव होता.

१९७८-७९ चा काळ होतो. विनोबांनी गोवध-बंदीसाठी आमरण अुपोषण आरंभिलं होतं. विरोधी पक्षात असलेल्या कांग्रेसचं या मुद्यावर समर्थन मिळणं आवश्यक होतं त्यावरच मोरारजी सरकारची राज्यसभेत घटना दुरुस्ती पारित करण्याची संभावना अवलंबून होती. म्हणून विनोबांचं अुपोषण सुटण्याची किल्ली इंदिरा गांधीच्या हातात होती. बोलणी सुरु होती. विनोबांतर्फे दादा बोलणी करण्यात भाग घेत होते. इंदिराजींच्या दूताने त्यांचचं समर्थन कळवलं. सर्वांना हायसं वाटलं. गोष्टी मान्य केल्याच नाहीत असं म्हणाल्या. विनोबांचं अुपोषण तर मोडलेलं. लाजीरवाणी स्थिती निर्माण झाली. त्यावेळी दादांनी दोष स्वतःवर घेतला. म्हणाले,  मी सौदेबाजीची बोलणी करण्यासाठी योग्य माणूस नाही. समोरचा माणूस लबाड बोलेल हे मानून मी चर्चा करु शकत नाही. म्हणून फसलो!"

खोटं बोलून कोण फसलं ? वंचना करणारा स्वतः सत्याला वंचित होत असतो. विश्वास ठेवणारा समृध्द होत असतो. दादांचं प्रेम व विश्वासाचं शास्त्र हे व्यावहारिक जगापेक्षा वेगळं होतं. दादा रस्त्यावरचं राजकारण करणारे धूर्त किंवा लढाअू राजकारणी कधीच नव्हते. माणसांवर प्रेम करणारे व विचारांच्या मानस सरोवरातील मोती वेचणारे धवल निष्कलंक राजहंस होते.

अेक दिवशी राजहंस अुडून गेला!